Lovable

NEW YORK ▪ MILAN ▪ TOKYO ▪ SYDNEY

Date: **September 5, 2018**

To,

The Department of Corporate Services- CRD
BSE Limited (BSE)
Phiroze Jeejeebhoy Towers
Dalal Street
Mumbai- 400001.

Scrip Code: **533343**

The Listing Department
National Stock Exchange of India Limited (NSE)
'Exchange Plaza', C - 1, Block G,
Bandra-Kurla Complex,
Bandra (E),
Mumbai 400051.

Symbol: **LOVABLE**

Dear Sir/ Madam,

**Sub: Copies of Public Notice- Addendum to the Notice of 31st AGM**

Pursuant to the Regulation 30 of SEBI (Listing Obligation and Disclosure Requirement) Regulations, 2015, we hereby file copies of Notice published in newspapers relating to the Addendum to Notice of 31st Annual general Meeting (AGM).

Kindly, take it on your record.

Thanking You,

Yours faithfully,

For **Lovable Lingerie Limited**

LOVABLE LINGERIE LTD. MUMBAI

Divya Shrimali

**Company Secretary & Compliance Officer**

# मराठा क्रांती मोर्चाच्या समन्वय समितीत स्थान न मिळाल्याने महिलांची स्वतंत्र समिती

## समितीला काही महिलांचा विरोध

**प्रतिनिधी**

पुणे, दि. ४ - मराठा आरक्षणासाठी मराठा क्रांती मोर्च्याच्या आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यासाठी समन्वय समिती गठीत करण्यात आली आहे. मात्र, त्या समितीमध्ये महिलांना स्थान मिळाले नसल्याचा आरोप करत मराठा क्रांती मोर्चातील महिलांनी संघटनेच्या कार्यपद्धतीचा निषेध करत 'सकल मराठा महिला क्रांती मोर्चा' या नावाने स्वतंत्र राज्यस्तरीय समितीची स्थापना केल्याची घोषणा मंगळवारी पुण्यामध्ये पत्रकार परिषदेमध्ये केली. या घोषणेवेळी मराठा क्रांती मोर्च्याच्या काही महिलांनी मात्र याला विरोध केला. त्यामुळे मराठा क्रांती मोर्च्यामध्ये फुट पडल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यभरात मागील दोन वर्षात तब्बल ५८ मूक मोर्चे काढण्यात आले. या दरम्यान अनेक वेळा समन्वयकांच्या बैठका देखील झाल्या. दरम्यान, पुण्यामध्ये १ सप्टेंबर रोजी बैठक आयोजित करून त्यामध्ये आंदोलनाची पुढील दिशा ठरविण्यासाठी समन्वय समितीची घोषणा करण्यात आली होती. त्या बैठकीला महिलांना बोलवलं नाही तसेच समन्वय समितीत महिलांना स्थान दिले नाही म्हणून पुण्यातील काही महिलांनी सकल मराठा महिला क्रांती मोर्चाच्या राज्याची समिती स्थापन केली. या समितीची घोषणा करण्यासाठी पुण्यात पत्रकार परिषद आयोजित केली होती. पत्रकार परिषद सुरू झाल्यावर मराठा क्रांती मूक मोर्चातील महिला त्या ठिकाणी आल्या आणि महिलांच्या या समितीला त्यांनी विरोध दर्शविला. तर या बाबत मराठा क्रांती मोर्चाच्या समन्वयकांशी तुमचे या विषयी बोलणं झाले आहे का असा सवाल मराठा क्रांती मोर्चाच्या विद्यार्थ्यांनी समन्वयक पूजा झोळे यांनी उपस्थित केला.

त्यावर महिला क्रांती समितीच्या उषा पाटील म्हणाल्या की, आजवर अनेक मोर्चामध्ये सहभागी झालो. मात्र अनेक बैठकामध्ये महिलांना डावलण्याचा प्रकार घडला. असाच प्रकार १ तारखेच्या बैठकीत घडल्याने अखेर स्वतंत्र सकल मराठा महिला क्रांती मोर्चाच्या समितीची स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच आता महिलांची भूमिका मांडण्यासाठी ७ तारखेला राज्यस्तरीय पुण्यात आयोजित पत्रकार परिषद केली आहे. त्यावेळी महिलांची संख्या यांना समजेल अशा शब्दात त्यांनी भूमिका मांडली.

# अकोल्यातील जिल्हाधिकाऱ्यांची गांधीगिरी

**वृत्तसंस्था**

अकोला, दि. ४ - अकोल्याचे जिल्हाधिकारी आस्तिक कुमार पाण्डेय यांच्या गांधीगिरीची सर्वत्र जोरदार चर्चा सुरू आहे. जिल्हाधिकारी आस्तिक यांनी अकोल्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाला अचानक भेट दिली. यावेळी कार्यालयातील भिंती पान खाऊन पिचकारी मारल्याने रंगलेल्या दिसल्या. मग जिल्हाधिकाऱ्यांनी भिंत साफ करायला सुरूवात केली. जिल्हाधिकाऱ्यांच्या या गांधीगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यानंतर मात्र कार्यालयातील अस्वच्छतेबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधितांना चांगलंच फैलावर घेतले.

जिल्हाधिकारी पाण्डेय यांनी काल अकोल्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाला अचानक भेट दिली. यावेळी कार्यालयातील भिंती पिचकाऱ्यांनी रंगलेल्या दिसल्या. मग, जिल्हाधिकाऱ्यांनी स्वत: बकेट आणि पाणी घेत ती भिंत साफ करायला सुरूवात केली. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर चांगलंच खजिल व्हायची वेळ आली. या कार्यालयातील अस्वच्छतेबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधितांना फैलावर घेतलं. आस्तिक कुमार पाण्डेय यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता कार्यालयाची झाडाझडती घेतली.

कार्यालयातील भिंत जिल्हाधिकारी साफ करत असल्याचं बघताच, तेथे उपस्थित कार्यकारी अभियंता कार्यालयातील एका महिलेने भिंत साफ करण्याचे काम थांबवण्याची विनंती केली. संबंधित महिला कर्मचाऱ्याच्या विनंतीवरून जिल्हाधिकारी पाण्डेय यांनी भिंत साफ करण्याचं काम थांबविलं. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता कार्यालयात अस्वच्छतेचे साम्राज्य पसरल्याचं पाहून जिल्हाधिकाऱ्यांनी आश्चर्य व्यक्त केलं. यासंदर्भात जिल्हाधिकारी पाण्डेय यांनी कार्यकारी अभियंता मिथिलेश चौहान यांना कानपिचक्या देत, दोन दिवसात साफसफाई करण्याचे निर्देश दिले.

**पिचकाऱ्यांनी रंगलेली भिंत जिल्हाधिकारी आस्तिक कुमार पाण्डेय यांनी केली साफ**




**जनकल्याण सहकारी बँक लि.**
(शेड्यूल्ड बँक)
विवेकदर्शन, १४०, सिंधी सोसायटी, चेंबूर, मुंबई-७१.

**वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**

**या सूचनेद्वारे कळविण्यात येते की, जनकल्याण सहकारी बँकेच्या सर्व सभासदांची ४५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार, दि. ११ सप्टेंबर २०१८ रोजी सायंकाळी ५.०० वाजता यशवंत भवन पांडुरंग बुधकर मार्ग, लोअर परेल, मुंबई ४०००१३ येथे बोलवण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती. छापील नोटीस बँकेच्या सर्व सभासदांना बँकेच्या दप्तरी नोंद असलेल्या त्यांच्या पत्त्यावर पोस्टाद्वारे पाठविली आहे.**

संचालक मंडळाच्या आदेशावरुन
श्रीकांत कदम
मुख्य कार्यकारी अधिकारी



**जाहीर सूचना**

श्री. अनिल प्रेमलाल अग्रवाल हे ११/०५/२०१६ रोजी निधन झाले असून माझे अशिल श्री. कुश प्रेमलाल अग्रवाल हे त्यांचे वारसदार असून त्यांच्या पश्चात त्यांचे कुश प्रेमलाल अग्रवाल आणि सौ. जयमाला के. अग्रवाल हेच फक्त वारसदार आहेत. त्यानुसार सौ. जयमाला के. अग्रवाल यांनी सोसायटीला अनिल प्रेमलाल अग्रवाल याचे सर्व अधिकार माझ्याअशिलाला हस्तांतरण करण्यासाठी एनओसी दिली आहे.

श्री. अनिल प्रेमलाल अग्रवाल हे फ्लॅट क्र. ए१७, साई आराधन सीएचएस लिमिटेड, जेसल पार्क भाईदर, पूर्व, जिल्हा ठाणे. याचे मूळ मालक आहेत. माझ्या अशिलाकडून ९/०८/२०१८ रोजी मेकवेल इंटरप्राईज आणि स्वयं अनिल अग्रवाल दिनांक ०२/०४/१९९० यांच्यामधील रोजीचे मूळ बांधकाम करारपत्र गहाळ झाले आहे. म्हणून माझ्या अशीला तर्फे मी ज्यांचे दावे/तक्रार/त्रयस्थ पक्षकारांचे दावे असतील तर सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत कळवावे. जर कोणत्याही व्यक्ती किंवा व्यक्तींना कोणत्याही प्रकारची तक्रार किंवा दावे करायचे असतील तर त्यांनी वकील पुष्पा शमदासनी, पी. एस. शमदासनी आणि ओसोसिएट्स, १५४/२, ओसवाल ऑरनेट, जेसलपार्क, भाईंदर (पू.), जिल्हा-ठाणे, यांच्याशी संपर्क साधावा किंवा हरकती/मागण्या पुरव्यासहित चेअरमन/सोसायटीचे सेक्रेटरी यांना पाठवाव्यात. जर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसात कोणत्याही हरकती आल्या नाहीत तर वर संबोधलेल्या फ्लॅटचे हस्तांतरण आणि विक्रीसाठी मोकळीक राहील. तसेच प्रमाणपत्र जारी केले जाईल त्यानंतर कोणतेही दावे ग्राह्य धरले जाणार नाहीत.

पी. एस. शमदासानी आणि आसोसिएट्स
अॅड. पुष्पा शमदासानी
(अॅडव्होकेट उच्च न्यायालय)
दिनांक : ०५/०९/२०१८


# गणेश मंडळांना बॉक्स कमानीबाबत दोन दिवसात परवानगी न दिल्यास आंदोलन

## माजी आमदार मोहन जोशी यांचा इशारा

**प्रतिनिधी**

पुणे, दि. ४ - गणेशोत्सव अवघ्या दहा दिवसांवर येऊन ठेपला असताना पोलीस व महापालिका प्रशासनाकडून गणेश मंडळांना बॉक्स कमानी बाबत परवानगी देण्यात आलेली नाही. त्यामुळे आगामी दोन दिवसात मंडळांना बॉक्स कमानी उभारण्याकरता परवानगी न दिल्यास महापालिकेसमोर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा काँग्रेसचे माजी आमदार मोहन जोशी यांनी दिला आहे.

नोटाबंदी, वाढती महागाई यामुळे गणेशोत्सव मंडळांकडे वर्गणी व निधीची कमतरता आहे. त्यामुळे किमान जाहिरातींच्या माध्यमातून तरी दिमाखदार उत्सव साजरा करता येईल असे कार्यकर्त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र, अजूनही कमानींकरता परवानगी देण्यात आलेली नाही.

गणेशोत्सवातजाहिरातदारांकडून जाहिरात घेऊन त्यातून मिळणाऱ्या निधीवर मंडळाचे अनेक खर्च अवलंबून असतात. यंदा अजूनही बॉक्स कमानींचा वाद सुरूच आहे. अनेक जाहिरातदारांशी बोलून मंडळांनी जाहिरातीकरिता रक्कम देखील घेतली आहे. परंतु परवानगी न मिळाल्याने कार्यकर्ते संभ्रमात आहेत.

गणेशोत्सव मंडळांच्या कार्यकर्त्यांच्या भावना तीव्र असून, पोलीस व महापालिका प्रशासनाने पुढील दोन दिवसात प्रत्येक मंडळाला किमान दोन तरी कमानी उभारण्याकरिता परवानगी द्यावी. अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा मोहन जोशी यांनी दिला आहे.

गणेशोत्सव हा उत्सव काही दिवसांवर आलेला असून हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होतो.

# जामखेडमध्ये कार अपघातात ८ जण जखमी

अहमदनगर, दि. ४ (वृत्तसंस्था) - जामखेड नगर रोडवर कारला अपघात होऊन आठ जण जखमी झाले. साईबाबांच्या दर्शनासाठी निघालेल्या साईभक्तांच्या इनोव्हा गाडीला जामखेड नगर रोडवर अपघात झाला. या अपघातात आठ जण जखमी झाल्याची माहिती मिळते.

जखमींना जामखेड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. ही गाडी आंध्र प्रदेशातील हैदराबादहून येत असल्याची माहिती मिळते आहे. जामखेडहून दहा किमी अंतरावर असलेल्या पोखरी फाट्याजवळ सकाळी आठ वाजताच्या सुमारास ही गाडी पुल-ावरून खाली कोसळली. अपघात होताच स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेतली. सर्व जखमींना गाडीतून बाहेर काढून जामखेड ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले. जखमींवर सध्या उपचार सुरू असून तीन जखमींची प्रकृती अत्यंत नाजूक असल्याचे समजते.

# येवला तालुक्यात महिलेचा खून

## कुजलेल्या मृतदेहाच्या तपासातून माहिती उघड

**वार्ताहर**

लासलगाव, दि. ४ - येवला तालुक्यातील निमगाव मढ शिवारात एका महिलेचा तीन दिवसांपूर्वी सांगाडा सापडला होता. त्यावरून येवला पोलिस व नाशिक स्थानिक गुन्हे शाखेने कसून तपास सुरू केला असता महिलेचा खून झाला असून हा खून अनैतिक संबंधातून झाल्याचे पो-लीस तपासात उघड झाले आहे.

येवला तालुका पोलीस ठाण्यातील निमगाव मढ शिवारातील रस्त्याच्या कडेला उसाच्या शेतात एक अनोळखी महिलेचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत मिळून आला होता. मृत महिलेचा फक्त सांगाडाच शिल्लक राहिलेला होता. त्यामुळे महिलेची ओळख पटवण्याचे पोलिसांपुढे मोठे आव्हान उभे होते. मात्र घटनास्थळावर मयत महिलेच्या अंगावर मिळालेली साडी व चीजवस्तूंची पडताळणी केली असता २२ ऑगस्ट पासून बेपत्ता असलेल्या महिलेच्या नातेवाईकांना सर्व गोष्टीची माहिती दिली. त्यानंतर ही सरला कृष्णा सोमासे हीच महिला आहे अशी ओळख पटल्यानंतर पोलिसांनी हा प्रकार कोणी केलेला असावा याचा तपास सुरू केला. या तपासात येवला तालुक्यातील दोन मित्रांचे या महिलेबरोबर अनैतिक संबंध होते या दोघांची महिलांची जवळकी वाढल्यामुळे या महिलेने या दोन मित्रांकडे पैशाची मागणी केली. तुम्ही जर पैसे दिले नाही तर तुमच्या घरी मी हा प्रकार सांगून देईल अशी धमकी मयत महिला सरला कृष्णा सोमवंशी हिने निलेश भागवत गीते, अमोल दत्तू मोरे राहणार तालुक्यातील महाल्खेडे यांना दिली होती. हे दोघेही मित्र अविवाहित असल्यामुळे सरलाने जर हा प्रकार कोणाला सांगितला तर आपली बदनामी होईल म्हणून त्यांनी सरलाला मारायचे ठरविले. त्यानुसार २२ ऑगस्ट रोजी महालखेडा गावात लक्ष्मी देवी यात्रा होती. याच दरम्यान निलेशने फोन करून सरलाला सांगितले की आम्ही तुला पैसे देणार आहे. तर तू आम्ही सांगत असलेल्या ठिकाणी भेट. या दरम्यान सरलाने कोणाला लक्षात येऊ नये म्हणून कपड्याने तोंड झाकून ती ठरल्याप्रमाणे रस्त्यावर आली. त्यानंतर ती दुचाकीवर बसून निघाली. याच वेळी रस्त्यात दुचाकी थांबवून निलेश व अमोल याने सरलाला निमगाव मढ हद्दीतील उसाच्या शेतात नेऊन साडी च्या साह्याने तिचा गळा आवळून खून केल्याचे येवला पोलीस व नाशिक स्थानिक गुन्हा शाखेच्या उघडकीस आले आहे. या दोघाही आरोपींना पोलिसांनी अटक केली असून पुढील तपास मनमाड विभागीय अधिकारी करत आहेत.


**लव्हेबल लिंगरी लिमिटेड**
सीआयएन : L17100MH1987PLC044835
**नोंदणीकृत कार्यालय :** ए-४६, स्ट्रीट क्र. २, एमआयडीसी, अंधेरी (पूर्व), मुंबई -४०० ०९३.
**दूर. क्र. :** ०२२-२८३८ ३५८१ **फॅक्स :** ०२२-२८३८ ३५८२
**ई-मेल आयडी :** corporate@lovableindia.in **वेबसाइट :** www.lovableindia.in

**३१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेचे परिशिष्ट**

लव्हेबल लिंगरी लिमिटेड (कंपनी) यांनी लव्हेबल लिंगरी लिमिटेडच्या सभासदांच्या ३१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेकरिता सूचना दि. ०७ ऑगस्ट, २०१८ (एजीएम सूचना) जारी केली आहे ती सीटीसी बँक्वेट, सिटी पॉईंट, राजर्षी शाहू महाराज रोड, टेली गली, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०६९ येथे सोमवार, दि. २४ सप्टेंबर, २०१८ रोजी दु. ३.०० वा. आयोजित करण्यात येत आहे. एजीएमची सूचना आधीच कंपनीच्या सर्व सभासदांना पाठविण्यात आली आहे व कंपनी कायदा, २०१३ च्या तरतूदीसह अनुपालन अंतर्गत नियमांच्या अंतर्गत सभासदांना पाठविण्यात येतील.

एजीएमची सूचना जारी करण्याच्या तारखेपासून दि. ०७ ऑगस्ट, २०१८ रोजी सदर कायद्यानुसार श्री. एल. जयपाल रेड्डी यांना संपूर्ण वेळी कंपनीच्या सभासदांना दि. ०३ सप्टेंबर, २०१८ कंपनीचे परिशिष्ट बाब क्र. ४ चा अजेंडा यांची एजीएम पुन:नियुक्त करून श्री. एल. जयपाल रेड्डी यांना कंपनीचे संपूर्ण वेळ संचालक म्हणून नियुक्त केले आहे.

सभासदांनी लक्ष द्यावे की, कंपनी परोक्ष ई-मतदान सुविधा त्यांच्या सभासदांना प्रदान करत आहे व सर्व ठराव प्रस्ताव एजीएममध्ये व्यवहार करण्यास प्रस्ताव करण्यात आला आहे.

तथापि, सदर एजीएमच्या सूचनेचे परिशिष्ट यांच्याद्वारे कंपनीच्या सर्व सभासदांना सूचना देण्यात येते की, सभासदाने मतपत्रिकेद्वारे व परोक्ष ई-मतदानाद्वारे अशा दोन्ही पद्धतींनी मत दिलेले असल्यास परोक्ष ई-मतदानाद्वारे दिलेले मत ग्राह्य धरले जाईल व मतपत्रिकेद्वारे दिलेले मत अवैध गणले जाईल. परोक्ष ई-मतदानाद्वारे आधीच आपले मत दिलेले सभासद एजीएममध्ये उपस्थित राहू शकतील परंतु त्यांना एजीएममध्ये पुन्हा आपले मत देता येणार नाही.

एजीएमच्या सूचनेचे सदर परिशिष्ट अंतर्ग भाग व सूचना दि. ०७ ऑगस्ट, २०१८ रोजी कंपनीच्या सभासदांना प्रसारित करण्यात आली आहे.

त्यांच्या अकस्मात मृत्युमुळे कंपनीचे संपूर्णवेळ संचालक श्री. एल. जयपाल रेड्डी (डीआयएन : ०१५३९६७८) यांच्या पुन:नियुक्तीकरिता एजीएमच्या सूचनेचा अजेंडा बाब क्र. ४ काढून टाकण्यात येत आहे.

**कंपनीस सदर संचालक यांच्या मृत्युनंतर एजीएमच्या सूचनेपासून कंपनी कायदा, २०१३ च्या सर्व अन्य लागू तरतूद व नियम व परिशिष्ट ५ सहवाचन अनुच्छेद १९६, १९७ च्या तरतूदीअंतर्गत संपूर्णवेळ संचालक म्हणून पुन:नियुक्ती करिता श्री. एल. जयपाल रेड्डी (डीआयएन : ०१५३९६७८) यांच्या प्रस्तावित उमेद्वार यांच्या ठराव क्र. ४ काढून टाकण्यात येत आहे.**

सभासद व अन्य भागधारक यांनी कृपया सदर परिशिष्टासह एजीएमची सूचना वाचावी.

त्यानुसार, नियुक्तीकरिता सर्व संबंधित सभासद, स्टॉक एक्सचेंज, जमाकर्ता, रजिस्ट्रर व शेअर हस्तांतरण एजन्ट, एजन्सी यांच्या परोक्ष ई-मतदान, अन्य प्राधिकरण, विनियमन व सर्व अन्य संबंधित व्यक्ती यांनी कृपया सदर सूचनेची नोंद घ्यावी.

सदर सूचना कंपनीची वेबसाइट www.lovableindia.in व स्टॉक एक्सचेंज वेबसाइट www.nseindia.com व www.bseindia.com वर कॉर्पोरेट घोषणा अनुभाग यांच्या अंतर्गत उपलब्ध आहे.

धन्यवाद,

**लव्हेबल लिंगरी लिमिटेडकरिता**
सही/-
दिव्या श्रीमाळी
**कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी**

ठिकाण : मुंबई
दिनांक : ३१ ऑगस्ट, २०१८


# कपाशी चुरडा रोगाच्या प्रादुर्भावाने शेतकरी अडचणीत

नागपूर, दि. ४ (प्रतिनिधी) - वर्धा जिल्ह्याच्या देवळी तालुक्यातील गौळ परिसरात कापूस पिके चांगली असताना मोठ्या प्रमाणात चुरडा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. त्यामुळे पुन्हा उत्पन्नात घट येण्याची शक्यता असल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत. या भागात गेल्या २० ते २५ दिवसांपासून ढगाळी वातावरण असून पावसाच्या अधूनमधून हलक्या सरी येत आहेत. पिकांची वाढ चांगली झाली असली तरी चुरडा रोगाने आक्रमण केले. त्यामुळे सद्यस्थितीत पिकांची वाढ खुंटली आहे. पात्या, फुले सुद्धा गळू लागली आहेत. तर झाडांची पाने पूर्णपणे सुकल्यागत दिसून येत आहेत. शेतकरी या रोगावर नियंत्रण मिळविण्यासाठी रासायनिक औषधांची फवारणी करीत आहे. तरीही वातावरणामुळे त्या फवारणीचा पिकांवर फारसा परिणाम झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. यामुळे अखेरच्या क्षणी उत्पन्नात वाढ होण्याची भिती व्यक्त होत आहे.

# शिर्डीतील मानाची दहीहंडी मुंबईच्या महिला पथकाने फोडली



**वार्ताहर**

शिर्डी, दि. ४ - शिर्डीत प्रथमच आयोजित केलेल्या महिला मानाची दहिहंडी मुंबई कुर्ला येथील गोरक्षनाथ महिला दहिहंडी पथकाने फोडुन १ लाख ११ हजार १११ रुपयांचे प्रथम क्रमांकाचे बक्षिस पटकावले. थरावर थर रचत चित्तथरारक प्रात्यक्षिक करुन महिलांनी दहिहंडी फोडल्याने त्यांचे कौतुक केले जात आहे.

साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव निमित्त शिर्डीत श्रीराम प्रतिष्ठान व वसंतदादा मल्टीस्टेट यांच्या वतीने प्रथमच मानाच्या महिला दहिहंडीचे आयोजन श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक तथा भाजयुमोचे सरचिटणीस रविंद्र गोंदकर, भाजपच्या नगरसेविका अंजलीताई गोंदकर, वसंतदादा मल्टीस्टेटचे चेअरमन मुकुंद सिनगर यांच्या वतीने श्रीराम सर्कल चौकात करण्यात आले होते.

यावेळी महिला दहिहंडी पथकाने वाद्यवृंदांच्या तालावर नृत्य सादर करून सर्वांची मने जिंकून घेतली. लहान मुलींच्या लेझीम पथकाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. मोठ्या प्रमाणात महिलांनी दहिहंडी कार्यक्रम पाहण्यासाठी गर्दी केली होती. थरावर थर रचत मुंबई कर्ला येथील गोरक्षनाथ महिला दहिहंडी पथकाने चित्तथरारक प्रदर्शन करून दहिहंडी फोडली. प्रथम बक्षिसाचे मानकरी ठरत साईनगरीतुन १ लाख ११ हजार १११ रुपयांचे बक्षिस यावेळी देण्यात आले. साईबाबांनी बक्षिस रुपात आम्हाला प्रसाद दिला असल्याची प्रतिक्रिया या महिला पथकाने व्यक्त केली.

# नांदेडातील कोट्यवधींच्या डांबर घोटाळ्यात दोन कंत्राटदारांना अटक

## सहा कंत्राटदारांविरोधात गुन्हा

**वार्ताहर**

नांदेड, दि. ४ - रस्ता कामासाठी डांबर खरेदीची बोगस बिले सादर करून शासनाला पंधरा ते वीस कोटींचा चुना लावल्याप्रकरणी तब्बल सात वर्षानंतर शिवाजीनगर पोलीस ठाण्यात सहा कंत्राटदारांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला. पाठोपाठ निखिला कंन्स्ट्रक्शनचे भास्कर कोंडा आणि मोरे कन्स्ट्रक्शनचे मनोज रावसाहेब मोरे यांना पोलिसांनी अटक केली.

नांदेडात २००८ ते २०११ या काळात गुरु-त्ता-गद्दी सोहळ्यानिमित्त कोट्यवधी रुपयांची कामे करण्यात आली. त्यामध्ये मजूर सोसायट्यांना मंजुरी नसताना कामे देणे, कामांचे तुकडे पाडणे, अवैधरित्या कामे मंजूर करुन घेणे या प्रकारात तत्कालीन अभियंता व सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपसचिव अविनाश धोंडगे यांच्यासह १४ जणांवर आरोप आहेत. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात त्यांची दुसऱ्यांदा याचिका फेटाळली. त्यानंतर आता डांबर घोटाळा समोर आला आहे. २०१०-२०११ या काळात शासनाने निर्देशित केलेल्या कंपन्यांकडून डांबर खरेदी न करता अन्य खाजगी कंपनीकडून डांबर खरेदी करणे, ते डांबर शासनाने निर्देशित केलेल्या कंपनीकडून खरेदी केल्याच्या बोगस पावत्या जोडणे, कागदोपत्री डांबर खरेदी करुन शासनाची फसवणूक करणे, शासनाच्या निधीचा अपव्यय करुन बोगस कामे करणे आदी तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. हे प्रकरण विधानसभेपर्यंत गेल्यानंतर सहाय्यक अभियंता संदीप कोटलवार यांच्या तक्रारीवरुन शिवाजीनगर पोलीस ठाण्यात सहा कंत्राटदारांविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. यात निखिला कंन्स्ट्रक्शनचे भास्कर कोंडा, मोरे कन्स्ट्रक्शनचे मनोज रावसाहेब मोरे, एस.जी.पद्मावार, सोनाई कन्स्ट्रक्शनचे सतीश देशमुख, सीएससंत्रे कन्स्ट्रक्शन, नुसरत कन्स्ट्रक्शनचे मोईज यांचा समावेश आहे.

### राजकीय मंडळींची रीघ

भास्कर कोंडा आणि मनोज मोरे यांना पोलिसांनी अटक केल्यानंतर सर्वच राजकीय पक्षांतील नेत्यांनी त्यांच्या भेटीसाठी पोलीस ठाण्यात गर्दी केली. या दोघांना भेटायला येणाऱ्या राजकीय मंडळींमुळे पोलिसांची मात्र डोकेदुखी वाढली.

### आणखी काही जण रडारवर

या प्रकरणात सहा कंत्राटदारांविरुद्ध गुन्हा नोंद झाला असून आणखी काही कंत्राटदारही रडारवर असल्याची माहिती हाती आली आहे. विशेष म्हणजे बिले मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांना मात्र मोकळे सोडण्यात आले आहे. अधिकाऱ्यांच्या संगनमताशिवाय एवढा मोठा घोटाळा कसा शक्य आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.


**क्रिएटिव्ह आय लिमिटेड**
**सीआयएनःएल९९९९९एमएच१९८६पीएलसी१२५७२१**
नों. कार्या.ः ''कैलाश प्लाझा, प्लॉट क्र. १२-ए, लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेटसमोर, न्यु लिंक रोड, अंधेरी (प.), मुंबई-४०० ०५३
फोन क्रः०२२-२६७३ २६१३ (७ लाईन्स) फॅक्स ः २६७३ २२९६
वेबसाईटः www.creativeeye.com ई-मेलः contact@creativeeye.com

**एजीएमची सूचना**

१) सूचना याद्वारे देण्यात येते की, कंपनीच्या सभासदांची ३२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ''जीएमएस कम्युनिटी सेंटर हॉल'', शितलादेवी कॉम्प्लेक्स'', १ ला मजला, डी.एन. नगर, इंडियन ऑईल नगरसमोर, लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०० ०५३ येथे बुधवार, २९ सप्टेंबर, २०१८ रोजी स. १०.३० वा. घेण्यात येणार आहे.

एजीएमच्या सूचनेसह ३१ मार्च, २०१८ रोजी संपलेल्या वर्षाकरिता वार्षिक अहवालाची प्रत कुरियरमार्फत सभासद रजिस्टरमध्ये नावे असलेल्या भागधारकांना पाठविण्यात आली आहे. सूचनेसह वार्षिक अहवाल पाठविण्याचे काम ४ सप्टेंबर, २०१८ रोजी पूर्ण झाले आहे. एजीएमच्या सूचनेसह वार्षिक अहवालाची इलेक्ट्रॉनिक प्रत कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपंटस्/रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्स्फर एजंटकडे ज्यांनी ईमेल आयडी नोंदविलेले आहेत त्या सभासदांना पाठविण्यात आली आहे आणि ती कंपनीची वेबसाईट www.creativeeye.com वर उपलब्ध आहे.

२) कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम ९१ आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स २०१५ च्या रेग्युलेशन्स ४२ च्या तुरतुदीनुसार सूचना पुढे देण्यात येते की कंपनीचे सभासद रजिस्टर आणि शेअर हस्तांतरण पुस्तके ही रविवार, २३ सप्टेंबर, २०१८ ते शनिवार (दोन्ही दिवस मिळून) पर्यंत कंपनीच्या ३१ व्या एजीएमच्या हेतूकरिता बंद राहतील.

**दूरस्थ ई-मतदान**

३) कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १०८ सहवाचता कंपनीज (मॅनेजमेट अॅण्ड अॅडमिनिस्ट्रेशनी) रूल्स २०१४ च्या नियम २० आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स २०१५ च्या रेग्युलेशन्स ४४ च्या तरतुदीनुसार कंपनीला एजीएममध्ये मंजूर करावयाच्या प्रस्तावित ठरावावर दूरस्थ ई-मतदानामार्फत इलेक्ट्रॉनिकली त्यांचे मतदान करण्याची सुविधा सभासदांना पुरविल्याचा आनंद होत आहे. कट ऑफ तारीख म्हणजे शनिवार २२ सप्टेंबर, २०१८ रोजीस प्रत्यक्ष स्वरूपात किंवा डिमटेरिअलाईज्ड स्वरूपात शेअर्स धारण केलेले सभासद इलेक्ट्रॉनिकली त्यांचे मतदान करू शकतात. सभासद मतदानाच्या फक्त एकाच पद्धतीचा म्हणजेच मतपत्रिका किंवा दूरस्थ ई-मतदानाचा वापर करू शकतात. सभासदाने दोन्ही माध्यमाने त्यांचे मतदान केल्यास दूरस्थ ई-मतदानाद्वारे केलेले मतदान विचारात घेतले जाईल आणि एजीएममध्ये मतपत्रिकेमार्फत केलेले मतदान अवैध समजण्यात येईल.

कंपनीच्या सभासदांनी याद्वारे हे सुद्धा कळविण्यात आणि विनंती करण्यात येते की :

ए) सभासद एजीएमच्या सूचनेत दिलेल्या किंवा कार्वीची वेबसाईट म्हणजेच http://evoting.karvy.com आणि तसेच कंपनीची वेबसाईट म्हणजेच www.creativeeye.com वर उपलब्ध ई-मतदानाच्या माहितीमार्फत जाऊ शकतात.

बी) दूरस्थ ई-मतदानाला मंगळवार २५ सप्टेंबर, २०१८ (स. ९.०० वा.) सुरूवात होईल आणि शुक्रवार २८ सप्टेंबर, २०१८ (सायं. ५.०० वा.) संपेल. दूरस्थ ई-मतदान त्यानंतर कार्व्हीद्वारे बंद करण्यात येईल.

सी) सभासदांचे मतदानाचे हक्क कट ऑफ तारीख म्हणजेच शनिवार २२ सप्टेंबर, २०१८ रोजीस कंपनीच्या भरणा झालेल्या समभाग भांडवलाच्या त्यांच्या शेअर्सच्या प्रमाणात राहतील.

डी) कोणीही व्यक्ती ज्यांनी सूचना पाठविल्यानंतर कंपनीचे शेअर्स संपादित केले आहेत आणि कंपनीचे सभासद बनले आहेत आणि कटऑफ तारीख म्हणजेच शनिवार २२ सप्टेंबर, २०१८ रोजीस शेअर्स धारण केलेले आहेत ते evoting@karvy.com. येथे विनंती पाठवून लॉगईन आयडी आणि पासवर्ड प्राप्त करू शकतात.

ई) मतपत्रिकेमार्फत मतदानाची सुविधा एजीएममध्ये सुद्धा उपलब्ध करण्यात येईल आणि सभेला हजर असलेले सभासद ज्यांनी दूरस्थ ई-मतदानाद्वारे त्यांचे मतदान केलेले नाही त्यांना मतपत्रिकेमार्फत सभेत त्यांचा हक्क वापरणे शक्य होईल.

एफ) सभासद दूरस्थ ई-मतदानामार्फत मतदानाचा त्यांचा हक्क वापरल्यानंतरही एजीएममध्ये सहभागी होऊ शकतात परंतु एजीएममध्ये पुन्हा त्यांचे मतदान करण्यासाठी हक्कदार नाहीत.

जी) इलेक्ट्रॉनिक मतदानाशी संबंधित कोणतीही तक्रार/चौकशीसाठी तुम्ही कार्व्हीची वेबसाईट http://evoting.karvy.com येथे उपलब्ध एफएक्युज सेक्शनचा संदर्भ घेऊ शकतात किंवा श्री. बी. वेंकटा किशोर, कार्व्हीचे सहाय्यक व्यवस्थापक, सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१-३२, फायनान्शिअल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, गचिबोवली, हैदराबाद यांना फोन क्र. ०४०-६७१६ १५८५ वर किंवा ईमेल kishore.bv@karvy.com यांना संपर्क करावा जे इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे मतदानाशी संबंधित तक्रारी स्वीकारतील.

**क्रिएटिव्ह आय लिमिटेड करिता**
**सही/-**
**खुशबू जी. शाह**
**कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ४ सप्टेंबर, २०१७**


# जळगावात २५०० किलो वांग्याचे भरीत बनणार

**प्रतिनिधी**

जळगाव, दि. ४ - जळगावची वांगी ही भरीतासाठी प्रसिध्द असली तरी या वांग्यांचे भरीत जगप्रसिध्द करण्यासाठी महाराष्ट्राचे लाडके शेफ विष्णू मनोहर हे २१ डिसेंबरला येथील सागरपार्क मैदानावर मराठी प्रतिष्ठानच्या सहकार्याने २५०० किलो भरीत बनवण्याचा जागतिक विक्रम करणार आहेत. या उपक्रमाची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड मध्ये नोंद करण्यात येणार असल्याची माहिती शेफ विष्णू मनोहर यांनी सोमवारी येथे एका पत्रकार परिषदेत दिली.

भरीत प्रेमी ही वांगी राज्यातच नव्हे तर परदेशात देखील मागवतात. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावरही वांगी होत असली तरी बामणोदची वांगी ही विशेष प्रसिध्द आहेत. गेल्या वर्षी बामणोद येथील वांग्यांची शेती पाहून हे भरीत जगप्रसिध्द करावे अशी कल्पना सुचली व आपण तयारीला लागल्याचे विष्णू मनोहर यांनी सांगितले.

२१ डिसेंबरला जळगावच्या सागरपार्क मैदानावर ३२०० किलो वांग्यांपासून २५०० किलो भरीत बनवण्यात येईल. या भरीतासाठी १२० किलो शेंगदाणा तेल, १०० किलो मिरची, ५० किलो लसूण, २० किलो शेंगदाणे, १०० किलो कोथिंबीर, २५ किलो मीठ तर पाच किलो जिरे लागणार आहे. ही ३२०० किलो वांगी भाजण्यासाठी ६ ट्रॅक्टर तुरकाडया ५ टन सरपणाची गरज भासेल. या शिवाय ६० महिला, ४० पुरूष २० सुपर वायझर असे मनुष्यबळ लागेल.

हे भरीत करण्यासाठी ४५० किलो वजनाची कढई तयार करण्यात येईल. ती दहा बाय दहा फूटाची असून तीन फूट खोल असेल. तसेच भरीतासाठी लागणारा सराटा अकरा फूट लांबीचा असेल. तर या भरीतासाठी ४००० किलो वजन पेलणारी चूल तयार करण्यात येईल. २१ डिसेंबरला पहाटे पाच वाजता या भरीताचे वांगे पारंपारिक पध्दतीने भाजण्यास सुरवात होईल. हे तयार करताना कोणत्याही यंत्राचा वापर करण्यात येणार नाही. याची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड मध्ये नोंद करण्यात येणार असल्याचे विष्णू मनोहर यांनी सांगितले.

# श्री उत्तर चिदंबरम नटराज मंदिरात कार्यक्रम

सातारा, दि. ४ (वार्ताहर)- सातारा येथील श्री उत्तर चिदंबरम नटराज मंदिरात गेले महिनाभर श्रावण महिन्या निमित्त विविध कार्यक्रम सुरू आहेत. याचाच एक भाग म्हणून शेवटच्या श्रावण सोमवारचे औचित्य साधून श्री नटराज कला शाळेच्या गुरु आंचल शानभाग घोरपडे व त्यांच्या शिष्यांनी बहारदार भरतनाट्यम केले. तसेच मंदिरात येणाऱ्या फुटबॉल आणि स्केटिंग करणाऱ्या बाल खेळाडूंनी दहीहंडी फोडून आनंद लुटला.

या कार्यक्रमाचे आयोजन मंदिराचे विश्वस्त रमेश शानभाग, मुकुंद मोघे, रणजीत सावंत, नारायण राव, उषा शानभाग यांनी केले होते. श्रावण महिन्यानिमित्त दि.९ सप्टेंबर पर्यंत मंदिरात विशेष मंडपात उभारण्यात आलेल्या साडे चार फुट उंच अशा महाकाय शिवपींडीच्या दर्शनाचा लाभ भावीकांना घेता येणार आहे. ही शिवपिंड पहाण्यासाठी सध्या मंदिरात गर्दी होत आहे. या शिवपिंडीला भावीकांना अभिषेक घालण्याची सुविधा करण्यात आली आहे.

# डेक्कन शुगर साखर कारखान्याला शेतकरी व शिवसैनिकांनी ठोकले कुलूप

## कारखानदाराने मागील हंगामात जाहीर केलेल्या ऊस दरानुसार थकित रक्कम तात्काळ देण्याची मागणी

**प्रतिनिधी**

नागपूर, दि. ४ - यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी मार्गावरिल मंगरुळ येथील डेक्कन शुगर प्रा.लि. या साखर कारखान्याला शिवसैनिक व शेतकऱ्यांनी कुलूप ठोकून कारखान्याच्या गेटवर ठिय्या आंदोलन केले. कारखानदाराने मागील हंगामात जाहीर केलेल्या ऊस दरानुसार शेतकऱ्यांची ४५० रुपये प्रति मेट्रीक टन थकित रक्कम शेतकऱ्यांना तात्काळ देण्याच्या मागणीसाठी सोमवारी दुपारी हे आंदोलन करण्यात आले. शिवसेना जिल्हाप्रमुख राजेंद्र गायकवाड व शेतकरी नेते देवानंद पवार यांच्या नेतृत्वात करण्यात आलेल्या या आंदोलनात शिवसैनिक व उस उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने भाग घेतला.

डेक्कन शुगर कारखाना संचालकांनी मागील हंगामात ऊस उत्पादक शेतकऱ्यांना उसाला प्रतिमेट्रीक टन भाव जाहीर केला होता. या भावानुसार शेतकऱ्यांचे प्रति टन ४५० रुपये प्रमाणे लाखो रुपये कारखान्याकडे थकित आहे. वारंवार निवेदन देऊन आंदोलनाचा इशारा देऊनही कारखान्याचे संचालक व व्यवस्थापकांनी रक्कम अदा केली नाही. त्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी शिवसेना व शेतकरी न्याय हक्क परिषदेच्या माध्यमातून सोमवारी मोर्चा काढून सकाळी बैठक बोलावली होती. या बैठकीला संचालक, व्यवस्थापक आले नाही. यामुळे संतप्त आंदोलकांनी कर्मचाऱ्यांना बाहेर काढून कारखान्याला कुलूप ठोकले.

यावेळी संचालक साधूराम वाधवाणी यांच्याशी फोनवरून चर्चा केली असता त्यांनी पैसे देण्यास स्पष्ट नकार दिला. यामुळे आंदोलन कर्त्यांनी कारखान्याच्या गेटवर हे आंदोलन सुरु केले. आंदोलनामध्ये शेतकरी विजय गवई, जयवंत गुघाने, सुधाकर गुघाने, नारायण गुघाने, विजय नखाते, राजु जयस्वाल, प्रदिप महल्ले, विश्वास सोनटक्के, बालाजी चिंचोळकर, संभाजी आसेगांवकर, गजानन सोनटक्के, प्रभाकर व महादु चिंचोळकर, काशीराम चिंचोळकर, विजय चिंचोळकर आदींसह शिवसैनिक व शेतकरी विकास परिषदेचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.